
# डॉ. सावंत, कोकरे यांना 'साहित्य अकादमी'

म. टा. विशेष प्रतिनिधी, नवी दिल्ली



डॉ. सावंत



प्रदीप कोकरे

- 'आभाळमाया' कवितासंग्रहाला बाल साहित्य
- 'खोल खोल दुष्काळ डोळे'ला युवा साहित्य पुरस्कार

साहित्य अकादमीने बुधवारी २४ भारतीय भाषांमधील लेखकांना बाल साहित्य व युवा साहित्य पुरस्कार जाहीर केले. मराठीसाठी नांदेडचे डॉ. सुरेश सावंत यांच्या "आभाळमाया" या कवितासंग्रहाला बाल साहित्य पुरस्कार व प्रदीप कोकरे यांच्या "खोल खोल दुष्काळ डोळे" या कादंबरीला युवा साहित्य पुरस्कार जाहीर झाला आहे.

कोकणीसाठी बालसाहित्य पुरस्कार नयना आडारकर यांच्या 'बेलाबाईचो शंकर आणि हेर कनायो'या कथासंग्रहाला तर युवा साहित्य पुरस्कार ग्लिनिस डायस यांच्या गावगाथा या कथासंग्रहाला जाहीर झाला आहे. ताम्रपट आणि प्रत्येकी ५० हजार रुपये असे दोन्ही पुरस्कारांचे स्वरूप आहे. दिल्लीत यंदा होणाऱ्या विशेष समारंभात पुरस्कार वितरण होईल असे साहित्य अकादमीचे सचिव के. श्रीनिवास राव यांनी सांगितले. १ जानेवारी २०१९ ते ३१ डिसेंबर २०२३ दरम्यान पहिल्यांदाच प्रकाशित झालेल्या पुस्तकांसाठी यंदाचे हे पुरस्कार देण्यात जाहीर झाले आहे.

नांदेड येथील डॉ. सावंत यांची बालसाहित्याची सुमारे ४० पुस्तके प्रकाशित झाली आहेत. डॉ. सावंत हे ख्यातनाम साहित्य संशोधकही आहेत. त्यांनी 'बालसाहित्याचा इतिहास', 'आंबेडकरी साहित्य', 'समाजपरिवर्तनाचे साहित्य' अशा अनेक विषयांवर अभ्यासपूर्ण लेखन केले आहे. युवा साहित्य पुरस्कारविजेते प्रदीप कोकरे यांनी 'खोल खोल दुष्काळ डोळे' कादंबरीमध्ये मुंबईतील गरीब कामगार वर्गाच्या जीवनाचे, बेरोजगारी आणि ग्रामीण भागातून महानगरांत स्थायिक होऊ इच्छिणाऱ्या तरुणांच्या आयुष्याचे चित्रण केले आहे. ही कादंबरी आधुनिक तरुण पिढीच्या भावविश्वाचे आणि संघर्षांचे चित्रण करते. अन्य बालसाहित्य पुरस्कार विजेत्यांत हिंदीसाठी सुशील शुक्ला यांना त्यांच्या 'एक बाते बारह' या कथासंग्रहासाठी, तर इंग्रजीमध्ये एम. पी. नितीन कुशलप्पा यांना 'दक्षिण, साउथ इंडियन मिथ्स अँड फेबल्स रीटोल्ड' या कथासंग्रहासाठी सन्मानित केले जाईल. युवा साहित्य पुरस्कारांत इंग्रजीसाठी अद्वैत कोठारी यांना 'सिद्धार्थ- द बॉय हू बिकेम द बुद्धा' या कादंबरीसाठी सन्मानित करण्यात येणार आहे.